दि. २१ जानेवारी २०२६
बुधवार
वर्ष ४ थे
अंक ८२
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

दैनिक

अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे

ईमेल-aditiexpress33@gmail.com, **Website: www.aditiexpress.in**

आजचे पंचाग

- दिनांक : २१ जानेवारी २०२६
- वार : बुधवार
- माह (अमावस्यांत) : माघ
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : शुक्ल पक्ष
- तिथी : तृतीया तिथी (२२ जानेवारी पहाटे ०२:४७ पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी
- नक्षत्र : धनिष्ठा नक्षत्र (दुपारी ०१:५७ पर्यंत) त्यानंतर शततारका नक्षत्र
- योग : व्यातीपात योग (सायंकाळी ०६:५७ पर्यंत) त्यानंतर वरीयान योग
- करण : तैतुला करण (दुपारी ०२:४७ पर्यंत) त्यानंतर गराजा करण
- चंद्र राशी : कुंभ राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी १२:५० ते दुपारी ०२:१३ पर्यंत
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:२४
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

दावोसमध्ये पहिल्याच दिवशी १४ लाख ५० हजार कोटींचे सामंजस्य करार



मुंबई : भारतातील उद्योग आणि गुंतवणूक क्षेत्रासाठी महाराष्ट्रच गेटवे-ऑफ-इंडिया' असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विधान खरे ठरवणारे तब्बल १४ लाख ५० हजार कोटींचे गुंतवणूक करार पहिल्याच दिवशी करण्यात आले. या गुंतवणूकीसोबतच राज्यात १५ लाख रोजगार संधी निर्माण होणार आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या माध्यमातून यंदा विविध विभागांनी आणि विविध क्षेत्रातील उद्योगांच्या प्रतिनिधी समवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

हरित ऊर्जा, अन्न प्रक्रीया, पोलाद निर्मिती, आयटी-आयटीईस, डाटा सेंटर्सह ईव्ही-ऑटोमोबाईल, जहाज बांधणी, डीजिटल इन्फ्रा अशा विविध क्षेत्रातील ही गुंतवणूक मुंबईसह राज्याच्या रत्नागिरी, पालघर, गडचिरोली, अहिल्यानगर या भागात पोहचणार असल्याने, तेथे उद्योग वाढीसह मोठ्या प्रमाणा रोजगार निर्मितीला चालना मिळणार आहे.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाचे प्रतिनिधीमंडळ दावोस येथे उपस्थित आहे. दावोस मधील पहिल्याच दिवसापासून जगभरातील विविध क्षेत्रातील उद्योगांनी महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दर्शवणे सुरु केले. **(पान २ वर)**

पुण्यात आंतरराष्ट्रीय सायकल टूरला अपघाताचे गालबोट

५० हून अधिक सायकलस्वार एकमेकांवर धडकले

पुणे : जागतिक स्तरावर पुण्याचे नाव उंचावणाऱ्या 'बजाज पुणे ग्रँड सायकल टूर' या भव्य स्पर्धेला मंगळवारी एका भीषण अपघाताने गालबोट लागले. स्पर्धेचा दुसरा दिवस असतानाच, एका सायकलस्वाराचा ताबा सुटल्याने पाठोपाठ येणारे सुमारे ५० हून अधिक खेळाडू एकमेकांवर जोरात आदळले. या विचित्र अपघातात अनेक सायकलस्वार गंभीर जखमी झाले असून सायकलींचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे.

पुणे जिल्हा सायकलिंग असोसिएशन आणि राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ही स्पर्धा मोठ्या उत्साहात सुरू झाली होती. मंगळवारी सकाळी खेळाडूंचा वेग प्रचंड असताना एका वळणावर आघाडीवर असलेल्या सायकलस्वाराचा ताबा सुटला. वेग जास्त असल्याने मागून येणाऱ्या खेळाडूंना वेळीच ब्रेक लावता आला नाही. परिणामी, साखळी प्रक्रियेप्रमाणे एकावर एक ५० हून अधिक सायकलींचा खच पडला. काही क्षणातच आनंदाचे रूपांतर ओरडाओरडीत झाले. या भीषण अपघातात खेळाडूंना हात, पाय आणि बरगड्यांना गंभीर दुखापत झाली आहे. मात्र, सुदैवाने सर्व खेळाडूंनी हेल्मेट घातलेले **(पान २ वर)**

टीईटी सक्तीतून जुन्या शिक्षकांना मिळणार मुक्ती?



पुणे : शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सक्तीमुळे देशभरातील हजारो शिक्षकांच्या मनात चिंता होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, शिक्षण क्षेत्रातील अनेक शिक्षकांना दोन वर्षांच्या आत टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले होते. असफल ठरलेल्या शिक्षकांना सेवानिवृत्तीचे आदेश दिले जात होते. या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये असंतोष आणि अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले होते.

केंद्र सरकारकडून टीईटी सक्तीमधून काही शिक्षकांना सूट देण्याच्या संदर्भात हालचाली सुरू झाल्या आहेत. या संदर्भात राज्य सरकारकडून शिक्षकांची सविस्तर माहिती मागविण्यात आली असून, ती शिक्षकांसाठी दिलासादायक ठरू शकते. शिक्षण विभागाने १३ जानेवारी २०२६ रोजी एक महत्त्वाचे परिपत्रक जारी केले आहे. ज्यामध्ये शिक्षकांच्या नियुक्तीचा कालावधी आणि वयोमानानुसार वर्गीकरण करून माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. **(पान २ वर)**

गोविंद पानसरे हत्याकांडातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा मृत्यू



कोल्हापूर : कॉम्रेड गोविंद पानसरे हत्याकांडा प्रकरणातील संशयित आरोपी समीर गायकवाड याचा आज सकाळी सांगलीत मृत्यू झाला. माहितीप्रमाणे,डॉक्टरांनी त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाला असल्याचे सांगण्यात आले आहे.

समीर गायकवाडची रात्रीच्या सुमारास अचानक तब्येत बिघडल्याने त्याला सांगलीतील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांनी सकाळी त्याचा मृत्यू झाल्याची घोषणा केली. शवविच्छेदनानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. समीर गायकवाड हा सनातन संस्थेचा साधक असून गोविंद पानसरे हत्याकांडातील प्रमुख संशयित होता. १६ फेब्रुवारी २०१५ रोजी कोल्हापूर येथे गोविंद पानसरे यांची हत्या झाली होती. पानसरे यांच्यावर जवळून गोळी झाडण्यात आली होती **(पान २ वर)**

नागपुरात आयकर विभागाची व्यापाऱ्यांवर मोठी कारवाई



नागपूर : महापालिका निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होताच नागपूर शहरात आयकर विभागाने मोठी धडक कारवाई करत व्यापाऱ्यांची पळापळ उडवून दिली आहे. शनिवारी पहाटेपासून आयकर विभागाच्या पथकाने नागपुरातील सुपारी व्यापाराशी संबंधित २० हून अधिक ठिकाणी एकाचवेळी छापे टाकून तपास सुरू केला आहे. या अचानक झालेल्या कारवाईमुळे शहरातील व्यापारी वर्तुळात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुपारीच्या कथित बेकायदेशीर व्यापारात सहभागी असल्याचा संशय असलेल्या काही नामांकित व्यापाऱ्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये राजू अण्णा उर्फ राजेश शिनॉय, अलताफ कलीवाला, आसिफ कलीवाला, गनी कलीवाला यांच्यासह काही ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांचा समावेश आहे. या व्यापाऱ्यांचे मुंबईतील सुपारी व्यापारी फारूक भाई यांच्याशी कथित आर्थिक व्यवहार असल्याची चर्चा असून, त्याच अनुषंगाने आयकर विभागाने ही कारवाई केल्याचे बोलले जात आहे. शनिवारी सकाळपासून आयकर विभागाची मोठी टीम शांतिनगर, कामठी रोड, कळमना परिसर आणि मां उमिया इंडस्ट्रियल एरिया येथे सक्रिय होती. राजू अण्णा यांच्या निवासस्थानासह कलीवाला बंधूंची कार्यालये व गोदामांमध्ये सखोल तपास करण्यात आला. याशिवाय इतवारी आणि जागनाथ बुधवारी परिसरातील सुपारी **(पान २ वर)**

अक्षय कुमारच्या डोळ्यासमोर सुरक्षा ताफ्याचा भीषण अपघात; मर्सिडीजने रिक्षेला चिरडले



मुंबई : बॉलिवूडचा 'खिलाडी' अक्षय कुमार याच्या सुरक्षा ताफ्यातील वाहनाचा सोमवारी रात्री जुहू परिसरात भीषण अपघात झाला. जुहू येथील 'थिंक जिम' जवळ एका भरधाव मर्सिडीज कारने अक्षय कुमारच्या ताफ्यामागे असलेल्या रिक्षेला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत रिक्षाचा अक्षरशः चक्काचूर झाला असून, रिक्षाचालक बासित खान हा गंभीर जखमी झाला आहे. सोमवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास अक्षय कुमार आपल्या कारमधून घराकडे जात होता. त्यांच्या कारच्या मागे सुरक्षेसाठी एक 'एस्कॉर्ट ' चालली होती. या सुरक्षा वाहनाच्या अगदी मागे बासित खान आपली ऑटो रिक्षा चालवत होता. याच वेळी पाठीमागून येणाऱ्या एका अतिवेगवान मर्सिडीज कारने रिक्षाला मागून प्रचंड जोरात धडक दिली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मर्सिडीजची धडक इतकी जोरदार होती की रिक्षा पुढे असलेल्या अक्षय कुमारच्या सुरक्षा वाहनाच्या एसयूव्ही खाली घुसली. धडकेनंतरही मर्सिडीज चालकाने ब्रेक न लावल्याने रिक्षा एसयूव्ही च्या खाली दबली गेली आणि त्यामुळे सुरक्षा वाहनाचा मागील भाग चक्क हवेत उचलला गेला. या विचित्र अपघातात रिक्षाचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. या अपघाताच्या वेळी अक्षय कुमार पुढच्या कारमध्ये होता, त्यामुळे त्याला कोणतीही दुखापत झाली नाही. तसेच त्याच्या सुरक्षा ताफ्यातील कर्मचारीही थोडक्यात बचावले आहेत. मात्र, रिक्षाचालक बासित खान याची प्रकृती चिंताजनक असून त्याला तातडीने उपचारासाठी **(पान २ वर)**

भारतावर पुन्हा होणार दहशवादी हल्ला? व्हायरल झालेल्या व्हिडीओमागचं सत्य आलं समोर



कराची : सोशल मीडियावर पाकिस्तानातून भारताला उद्देशून केलेले धमकीचे व्हिडीओ नवे नाहीत. मात्र सध्या व्हायरल होत असलेल्या एका नव्या व्हिडीओमुळे सुरक्षा यंत्रणांचं लक्ष वेधलं गेलं आहे. या व्हिडिओचा संबंध कुख्यात दहशतवादी हाफिज सईदच्या लष्कर-ए-तोयबा संघटनेशी जोडला जात आहे त्यामुळे पुन्हा एकदा भारतावरील संभाव्य दहशतवादी कारवायांबाबत चर्चा सुरू झाली आहे.

व्हायरल व्हिडीओमध्ये लष्कर-ए-तोयबा आणि त्याच्या राजकीय आघाडीशी संबंधित काही लोक दिसत आहेत. या फूटेजमध्ये पाकिस्तानातील तरुणांना विशेष स्वरूपाचं प्रशिक्षण दिलं जात असल्याचा दावा करण्यात येतो. विशेष म्हणजे हे प्रशिक्षण जमिनीवर नव्हे, तर पाण्यातील कारवायांसाठी असल्याचं सांगण्यात येत आहे.

या प्रकारामुळे २६/११ च्या मुंबई हल्ल्याच्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत. कारण त्या वेळी दहशतवादी समुद्रमार्गे भारतात घुसले होते. त्यामुळेच आता लष्कर-ए-तोयबा पाण्यातील लढाईसाठी तयारी करत असल्याचा दावा किती गंभीर आहे, यावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

व्हिडीओमध्ये स्वतःला लष्कर-ए-तोयबाचा कमांडर असल्याचं सांगणारा एक व्यक्ती 'हरीश डार' नावानं ओळख देतो. तो सांगतो की, तरुणांना स्कुबा डायव्हिंग, पोहणे, बोटी हाताळणे आणि आपत्कालीन बचाव सराव अशा बाबींचं प्रशिक्षण दिलं जात आहे. याशिवाय 'वॉटर फोर्स' उभारण्याचा दावाही या व्हिडिओत करण्यात आला आहे. या दाव्यानुसार आतापर्यंत शंभराहून अधिक जणांना बोट चालवण्याचं प्रशिक्षण दिलं असल्याचंही सांगण्यात येत आहे. हे वक्तव्य केवळ प्रचारासाठी आहे की भविष्यातील कटाचा भाग आहे, याचा शोध घेणं आता अत्यंत महत्त्वाचं ठरणार आहे.

(पान २ वर)

२० वर्षांपासून फरार असलेला आरोपी गजाआड



लातूर : २० वर्षांपूर्वी एका चोरी प्रकरणातील गुन्ह्यात पोलिसांना हवा असलेला व २० वर्षांपूर्वीपासूनचा फरार आरोपी बाबू लक्ष्मण कांबळे रा. बुधोडा, ता. औसा यास पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकाने गजाआड केले आहे. त्यास शिवाजीनगर पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, फिर्यादी अरविंद विठ्ठलराव भोसले, रा. शाहूपुरी कॉलनी, लातूर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १० जुलै २००६ रोजी रात्री सुमारे १० वा. त्यांच्या घरासमोर उभी केलेल्या अम्बेसेडर कार क्र. चएट-१५६१ मधून पॉईनर कंपनीचा सुमारे ४,०००/- रुपये किंमतीचा कार टेप अज्ञात चोरट्याने चोरी केला होता. यावरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे गु.र.नं. १२६/२००६, कलम ३७९ भा.दं. वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यात आरोपीस दि. १४ जुलै २००६ रोजी अटक करण्यात आली होती. मात्र, त्यानंतर तो न्यायालयात वारंवार अनुपस्थित राहू लागला. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले व अखेर सदर केस सुप्त संचिकेत ठेवण्यात आली. आरोपी गेली २० वर्षे सतत आपले वास्तव्य बदलून कायद्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न करीत होता. आज रोजी आरोपीस मा. न्यायालयात हजर करण्यात आले असता, मा. मुख्य न्याय दंडाधिकारी श्री. सतिश एन. पाटील यांनी त्यास दि. २७ जानेवारी २०२६ पावेतो न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कार्यवाही लातूर पोलीस दलाच्या प्रामाणिक, चिकाटीपूर्ण व जबाबदार कामकाजाचे उत्तम उदाहरण आहे. कितीही जुना गुन्हा असला तरी आरोपीला शोधून काढून त्यास न्यायालयासमोर उभे करण्याचा लातूर पोलिसांचा निर्धार यातून अधोरेखित होतो. यामुळे समाजात कायदा चुकवून कोणीही कायमस्वरूपी सुटू शकत नाही हा ठाम संदेश जात आहे. सदरची संपूर्ण कार्यवाही पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनाखाली पार पडली. लातूर पोलीस यांचे विशेष पथकातील सपोनि शिवशंकर मनाळे, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे, योगेश गायकवाड, श्रीकांत कुंभार यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

महाराष्ट्राच्या तरुणाने न्यूझीलंडमध्ये घोडेस्वारीची शर्यत जिंकली

पंढरपूर : कान्हापुरी (ता. पंढरपूर) येथील राहुल रघुनाथ भारती या तरुणाने न्यूझीलंडमध्ये 'हार्स रेसिंग स्पर्धेत' तब्बल २५ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवले आहे. ग्रामीण भागातील या तरुणाने सातासमुद्रापलीकडे जाऊन भारताचा डंका पेटला आहे. रेसिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याची माहिती मिळताच येथील ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला.

अवघ्या ३२ वर्षांच्या राहुल भारती या तरुणाला लहानपणापासूनच घोड्याच्या रेसिंग स्पर्धेविषयी खूप आकर्षण होते. पुणे येथे त्यांनी काही वर्षे प्रशिक्षण घेतल्यानंतर थेट न्यूझीलंड गाठले. महाराष्ट्रात जसे बैलगाडी शर्यतीला मानाचे स्थान आहे. **(पान २ वर)**

एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, अडसूळ यांचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपात जाहीर प्रवेश



लातूर दि. २० - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील विविध विकास कामांना प्रेरित होऊन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवार रोजी भारतीय जनता पार्टीत अनेकांनी जाहीर प्रवेश केला. या प्रसंगी लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष बन्सी भिसे, लालासाहेब पाटील, विजय काळे, सुनील पाटील, लक्ष्मीकांत घुटे, दत्ता सप्काळ, राम गाडे, ॲड. धनराज शिंदे, बालाजी गवळी यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थित होती.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड हे संपूर्ण मतदार संघाला विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत. त्यांच्या माध्यमातून मतदार संघातील गावागावात वाडीवस्तीत विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला. या निधीतून होत असलेल्या विकास कामांना प्रेरित होऊन लातूर तालुक्यातील मौजे एकुर्गा येथील माजी सरपंच दिनकर इंगळे, **(पान २ वर)**

दावोसचा संदेश

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दावोसला गेलेत. तेथे ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीस हजर राहणार. मुख्यमंत्री फडणवीस यांनी १६ लाख कोटींचे करार करण्याचे उद्दिष्ट ठेवले. सरकारने फडणवीस यांच्या नेतृत्वाचा उपयोग देशात गुंतवणूक आणण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी मुख्यमंत्री दावोसला उपस्थित राहिले होते तेव्हा आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका केली होती, की ही गुंतवणूक देशी कंपन्यांचीच आहे. केवळ ११ कंपन्या परदेशी आहेत. पण या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना बाजूला ठेवले तरीही एक बाब लक्षात येते ती ही, की मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रचंड गुंतवणूक आणली आहे आणि त्याचा उपयोग भारतातील बेरोजगारी दूर हटवण्यासाठी करण्यात येईल. गेल्या वर्षी १६ लाख कोटी रुपयांचे एमओयू करण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ७२ टक्के अमलात आले आहेत. यंदाही मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात गुंतवणूक आणण्यावर भर राहणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यंदा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हेही जागतिक आर्थिक मंचाचे आकर्षण असणार आहेत. कारण त्यांच्यासमवेत शिष्टमंडळ हे सर्वात मोठे असेल असे सांगण्यात येते. पण ट्रम्प यांनी अनेक देशांना टॅरिफ लावून जेरीस आणले आहे आणि त्यामुळे त्यांच्या वाटाघाटीत काय होते हे महत्त्वाचे आहे. पण विषय आपला महाराष्ट्राचा चालला आहे, तर फडणवीस सांगतात की यंदा गतवर्षीपेक्षाही जास्त गुंतवणूक आणणार आहे ते विशेष महत्त्वाचे आहे. मुळात दावोस गुंतवणूक ही जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम करते. जिथे देश आणि राज्ये, जसे की महाराष्ट्र किंवा मध्य प्रदेश राज्यातून जागतिक कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी प्रचंड प्रयत्न होतात. त्यामुळे रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि शाश्वत विकासाला चालना मिळते. भू-राजकीय तणाव आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारत हे एक प्रमुख गुंतवणूक ठिकाण म्हणून उदयास येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी सांगतात, की भारत हे गुतवणूकदारांचे अत्यंत आकर्षक आणि विश्वासाचे ठिकाण म्हणून सध्या उदयाला आले आहे. त्याचाच परिणाम म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा दावोस दौरा आहे.

कॅनडा आणि मेक्सिकोपाठोपाठ अमेरिकेने भारतावरही टॅरिफ लावण्याचा आणि तोही भरमसाट टॅरिफ लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतल्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला विशेष महत्त्व आहे. कारण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दावोस येथून जी गुंतवणूक आणतील त्यातून येथे रोजगार निर्माण होतील आणि त्याचा परिणाम येथील तरुणांना रोजगारांचा लाभ देण्यात होईल. त्याचबरोबर महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे आणि त्याचे पडसाद राज्याच्या औद्योगिक वाटचालीत दिसून येतात. मुख्यमंत्र्यांचा दावोस दौरा हे त्याचेच फल आहे. मुख्यमंत्र्यांच्या या दावोस दौऱ्याने स्टील म्हणजे पोलाद, केमिकल्स आणि सिमेंट बॅटरी या उद्योगात मोठी गुंतवणूक होईल. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याच काळात महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावरून पहिल्या क्रमांकावर आला आणि त्याचे एकमेव कारण होते ते औद्योगिक गुंतवणूक. राज्याची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर नेण्यासाठी राज्यात प्रचंड गुंतवणूक येण्याची गरज आहे आणि ती मुख्यमंत्री फडणवीसच आणू शकतात, असा विश्वास सर्वांनाच आहे. गेल्या काही वर्षांत भारतातील काही औद्यागिक राज्यांच्या सरकारांनी उदा. महाराष्ट्र, आसाम यांनी उच्चाधिकार शिष्टमंडळे दावोसला पाठवली आहेत. त्यात संबंधित राज्यांचे मुख्यमंत्रीही आहेत आणि हाच पॅटर्न यंदाही अमलात आणला आहे. ज्या क्षेत्रात गुंतवणूक केली जाणार आहे, ती क्षेत्रे आहेत स्वच्छ ऊर्जा, सागरी अन्नाची निर्यात आणि तत्सम क्षेत्रे. स्विस कंपन्यांना आपल्याकडे आकर्षित करून घेण्यात मुख्यमंत्री यशस्वी होतील यात काही शंका नाही.

महाराष्ट्राची स्पर्धा ही आसाम आणि मध्य प्रदेश या अन्य राज्यांशी असली तरीही त्यात विखार नाही. केवळ आपल्या राज्यासाठी जास्तीत जास्त गुंतवणूक आणणे आणि आपल्या लोकांना चांगल्यातील चांगले जीवन बहाल करणे हेच उद्दिष्ट आहे. कारण शेवटी राज्यकर्त्यांचे उद्दिष्ट तर आपल्या जनतेचे कल्याण करणे हेच असते. यंदा दावोस येथील भारताचे प्रतिनिधित्व भारतातील महाराष्ट्राचे फडणवीस तसेच आणि तेलंगणाचे रेवंथ रेड्डीशिवाय आसामचे विस्वकर्मा आणि झारखंडचे हेमंत सोरेन करतील. प्रत्येक राज्य त्याच्या गरजेच्या दृष्टीने औद्योगिक गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न करणार आहे. पण सर्वात महत्त्व आहे ते केवळ महाराष्ट्रालाच. कारण हे राज्य प्रगत आहे आणि गेल्या वर्षी त्याने विक्रमी गुंतवणूक आणली आहे. आणखी एक विशेष, की ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. अशावेळी ते जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीत सहभागी होत आहेत, हे निश्चित आहे, की ट्रम्प यांनी टॅरिफचा वापर शस्त्र म्हणून अनेक देशांविरुद्ध केला आहे आणि त्यात भारतही आला. केवळ देशांतर्गत उत्पादकांना संरक्षण देण्यासाठी त्यांनी हे प्रचंड टॅरिफचे शस्त्र उगारले. यात त्यांचा राजकीय उद्देष्यही आहे. जास्तीत जास्त रोजगार अमेरिकन लोकांनाच मिळावा हा त्यांचा उद्देश स्पष्ट आहे. वाढती जागतिक गुंतागुंत आणि भू-राजकीय तुकडे करणाऱ्या पार्श्वभूमीवर आर्थिक स्पर्धात्मकता यांच्या परिप्रेक्ष्यात जागतिक आर्थिक मंच जागतिक नेत्यांना भारतातील राजकीय नेत्यांना इमपार्शल म्हणजे तटस्थ मंच उपलब्ध करून देईल अशी आशा वाटते. मुख्यमंत्री फडणवीस यांची आणखी एक परीक्षा आहे आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात हे काळच दाखवेल. पण त्यांचे कर्तृत्व पाहता ते यातही यशस्वी होतील यात काही शंका नाही. ट्रम्प यांच्या एकांगीवादाला फडणवीस यांचे यश हेच उत्तर आहे. जागतिक आर्थिक मंचाची बैठक ही जग कोणत्या दिशेने जात आहे याविषयी अधिक आहे. सामान्य गुंतवणुकीसाठी जागतिक आर्थिक मंचाच्या बैठकीतील निर्णय हे परिणामकारक नसतात पण ते खरे असतात आणि त्यातून जे धोरणात्मक संदेश दिले जातात त्यांच्यासाठी ते वास्तविक असतात.

ट्रम्प यांची अरेरावी आता ग्रीनलँडवर डोळा

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अरेरावी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अमेरिकेने तेलासाठ्यासाठी व्हेनेझुएला या छोट्याशा देशावर अरेरावी करून त्या देशाच्या राष्ट्राध्यक्षांचे अपहरण करून त्यांना अटक केली आणि स्वतः ला व्हेनेझुएला या देशाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर त्यांनी इराणमधील आंदोलनांना हवा देऊन तो देश अस्थिर करण्याचा डाव आखला इतकेच नाही तर इराणवर अमेरिका मोठा हल्ला करेल आणि इराणचे सर्वोच्च धार्मिक नेते आयातुल्ला खोमेनी यांना पदच्युत करण्याची धमकी देऊन त्या देशावर अरेरावी केली. अमेरिकेच्या या अरेरावीचा संपूर्ण जग निषेध करत असतानाच ट्रम्प यांची नजर अमेरिकेचा शेजारी असलेला ग्रीनलँड या छोट्या देशावर पडली आणि हा देश देखील आपल्या घशात घालण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आणि ग्रीनलँड हा अमेरिकेचाच एक भाग असून लवकरच ग्रीनलँड हे अमेरिकेतील नवे राज्य असेल अशी घोषणा केली. ग्रीनलँडने स्वतःहून अमेरिकेत विलीन व्हावे आणि जर ग्रीनलँड स्वतःहून अमेरिकेत विलीन झाला नाही तर अमेरिका लष्करी बळ वापरून त्या देशाला अमेरिकेत विलीन करेल अशी धमकी दिली. इतकेच नाही तर जे देश ग्रीनलँडचे समर्थन करतील त्या देशांवर अमेरिका जबर आयात शुल्क अर्थात टेरिफ लावेल असा सज्जड दम देऊन त्यांना ब्लॅकमेल केले. ग्रीनलँडला समर्थन देणाऱ्या युरोपीय देशांना केलेले हे ब्लॅकमेलच आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या ब्लॅकमेली विरुद्ध युरोपात मोठा संताप व्यक्त केला जात आहे. ट्रम्प यांच्या या अरेरावी विरुद्ध डेन्मार्कची राजधानी कोपेनहेगन आणि इतर शहरात हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले आणि ग्रीनलँड हा विकाऊ देश नाही अशा घोषणा दिल्या. इंग्लंड, फ्रान्स या देशांनी देखील ट्रम्प यांच्या या धोरणावर टीका केली असून डोनाल्ड ट्रम्प यांनी ही अरेरावी थांबवावी असे निवेदन दिले आहे. केवळ युरोपच नव्हे तर संपूर्ण जग अमेरिकेच्या अरेरावी विरुद्ध एकजूट होत आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात अमेरिका खंडातही खदखद आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या विस्तारवादी धोरणाविरुद्ध दक्षिण अमेरिका खंडातील देशातीलही मोठी नाराजी आहे. आज या देशांनी जाहीरपणे तसे बोलून दाखवले नसले तरी ते ही डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर नाराज आहेत. अमेरिकेतील नागरिकांनाही ट्रम्प यांचे हे विस्तारवादी धोरण मान्य नाही पण ट्रम्प आपली हेकेखोरी सोडायला तयार नाही. काहीही करून आपल्या शेजारी असलेल्या लहान देशांना अमेरिकेत विलीन करून घ्यायचे, तेल संपन्न राष्ट्रांवर ताबा मिळवून तेथील तेलासाठे ताब्यात घ्यायचे तसेच जे आपले ऐकणार नाही त्यांच्यावर जबर आयात शुल्क अर्थात टेरीफ लावून त्यांना ब्लॅकमेल करायचे आणि संपूर्ण जगावर आपली एकहाती हुकूमत गाजवायची हे ट्रम्प यांचे धोरण आहे आणि ट्रम्प यांचे हेच विस्तारवादी धोरण जगाला युद्धाच्या खाईत घेऊन जाईल हे मात्र नक्की.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन



लातूर : येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवशीय शिबिराचे आयोजन मौजे दावतपूर,ता.औसा,जि. लातूर येथे दि.१७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आलेले आहे.'शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास ' या विशेष वार्षिक युवक शिबिराचे उद्घाटन दि.१८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता मौजे.दावतपूर या गावी होणार आहे.या उद्घाटन समारंभ कार्यक्रमप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी,उद्घाटक म्हणून संस्थेचे सचिव रमेश बियाणी व प्रमुख पाहुणे म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे रासेयो माजी संचालक डॉ.शिवराज बो ड के ,महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्ह्राळे,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर,दावतपूरचे सरपंच शिवदास कांबळे, उपसरपंच विठ्ठल बेडजवळगे, ग्रामविकास अधिकारी चलमले आर.एम.,मुख्याध्यापक संजीवन शिंदे,शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष नितीन बिराजदार व उपाध्यक्ष शिवशंकर पाटील,तंटामुक्ती अध्यक्ष भारतबाई बिराजदार,पोलिस पाटील दत्तात्रय कुंभार, महसूल अधिकारी आर.एम.पुरी,बीडीओ औसाचे आनंदकुमार मिरगणे,औसाचे तहसीलदार घनश्याम अडसूळ,रासेयो सदस्य डॉ.राहुल मोरे,डॉ.गजानन बने,प्रा.मेघा आत्राम,रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी विशाल तेलंगे व वैभवी माने यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या रासेयो शिबिराचा समारोप दि.२३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे.या समारोपप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार व प्रमुख पाहुणे म्हणून पर्यावरण तज्ज्ञ सुपर्ण जगताप यांची उपस्थिती असणार आहे.या शिबिरास स्वाराती मराठवाडा विद्यापीठचे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर,प्र.कुलगुरू डॉ.अशोक चव्हाण,रासेयो संचालक डॉ.मारोती गायकवाड,सहकार मंत्री महाराष्ट्र राज्य बाबासाहेब पाटील, आमदार अमित देशमुख,खासदार शिवाजी काळगे,खासदार ओमराजे निंबाळकर,आमदार अमित देशमुख,आमदार अभिमन्यू पवार,जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर,रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.बालाजी होकर्णे,पोलिस अधीक्षक अमोल तांबे, मिलिंद काळे,रासेयो विभागीय संचालक अजय शिंदे यांच्या संभाव्य भेटी होणार आहेत.सदरील रासेयो शिबिर यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्ह्राळे,रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर व इतर सदस्य,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे,सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि रासेयो स्वयंसेवक विद्यार्थी सक्रिय आहेत.

पान १ वरून

दावोसमध्ये...

यातून गुंतवणुकीचा मोठा ओघ सुरु झाल्याने महाराष्ट्र पॅव्हेलियनमध्ये उत्साहाचे चित्र निर्माण झाले. पुढील दोन दिवसांत विक्रमी गुंतवणूक येणार

येत्या दोन दिवसात दावोसमध्ये एआय़, क्वांटम कंम्प्युटींग, डीजिटल इन्फ्रास्ट्रक्चर, यांसह फिनटेक, लॉजिस्टिक्स अँण्ड इन्फ्रास्ट्रक्चर तसेच जहाज बांधणी, ईव्ही, अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रातील आणखी काही उद्योग घटकांशीही गुंतवणूकीचे सामंजस्य करार होणार आहेत. त्यादृष्टीने त्यांच्या प्रतिनिधींशी, बोलणी -चर्चांच्या फेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार गतवर्षी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (चखढठख) या गुंतवणूक आणि उद्योग सुलभतेला प्रोत्साहन देणाऱ्या समर्पित संस्थात्मक व्यवस्थेमुळे यंदा गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्राचा महाराष्ट्राकडील ओघ आणखी वाढला आहे.

सामंजस्य करार पुढीलप्रमाणे

महाराष्ट्र सरकार-काल्सबर्ग क्षेत्र: अन्न प्रक्रिया आणि कृषी गुंतवणूक: ५०० कोटी रोजगार : ७५०

महाराष्ट्र सरकार- योकी ग्रीन एनर्जी प्रा. लि. क्षेत्र: नविनिकरणीय ऊर्जा गुंतवणूक: ४ हजार कोटी रोजगार : ६ हजार ठिकाण: पालघर/एमएमआर

महाराष्ट्र सरकार-बीएफएन फॉर्जिंग्स क्षेत्र: स्टील गुंतवणूक: ५६५ कोटी रोजगार : ८४७ ठिकाण: पालघर/एमएमआर

एमएमआरडीए-सुमिटोमो रियालिटी गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए-के. रहेजा गुंतवणूक: सुमारे १० बिलियन डॉलर्स रोजगार : एक लाख.

एमएमआरडीए-अल्टा कॅपिटल/पंचशील गुंतवणूक: सुमारे २५ बिलियन डॉलर्स रोजगार : २ लाख ५० हजार.

एमएमआरडीए-एसबीजी समूह क्षेत्र: लॉजिस्टिक्स गुंतवणूक: सुमारे २० बिलियन डॉलर्स रोजगार : ४ लाख ५० हजार.

एमएमआरडीए-आयआयएसएम ग्लोबल गुंतवणूक: सुमारे ८ बिलियन डॉलर्स रोजगार : ८० हजार.

एमएमआरडीए-जायका धोरण आणि स्ट्रॅटेजी पार्टनर

एमएमआरडीए-सेम्बकॉर्प डेवलपमेंट लि. सिंगापूर एकीकृत इंडस्ट्रियल पार्कसाठी नॉलेज पार्टनर

एमएमआरडीए-टेक्निकल युनिव्हर्सिटी, मुनीच, जर्मनी शाश्वत नागरी वाहतूक प्रणाली

महाराष्ट्र सरकार-सुरजागड इस्पात क्षेत्र: स्टील गुंतवणूक: २० हजार कोटी रोजगार: ८ हजार. ठिकाण: गडचिरोली

महाराष्ट्र सरकार-लोढा डेव्हलपर्स क्षेत्र: आयटी, डेटा सेंटर्स गुंतवणूक: १ लाख कोटी रोजगार: १ लाख ५० हजार.

ज्यांनी महाराष्ट्रात आणखी गुंतवणूक आणि विस्तार करण्याची तयारी दर्शवली असे: कोकाकोला, आयकिया, स्कोडा ऑटो.

पुण्यात आंतरराष्ट्रीय...

असल्यामुळे डोक्याला होणारी मोठी इजा टळली आणि मोठी जीवितहानी टळली. सायकलींचे महागडे पार्टस आणि सांगाडे या धडकेत पूर्णपणे तुटले आहेत. यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना या स्पर्धेतून अर्ध्यातूनच बाहेर पडावे लागले आहे. अपघात घडताच घटनास्थळी तैनात असलेल्या रुग्णवाहिका आणि डॉक्टरांच्या पथकाने तातडीने धाव घेतली. जखमी खेळाडूंना प्राथमिक उपचार देऊन पुढील उपचारासाठी जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेनंतर काही काळ स्पर्धेच्या मार्गावर तणावाचे आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या स्पर्धेत सुरक्षेची काळजी घेतली गेली होती, मात्र खेळाचा वेग आणि तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात घडला. जखमी खेळाडूंना सर्वतोपरी मदत केली जात असून, उर्वरित स्पर्धा नियोजित वेळापत्रकानुसार पार पडणार आहे. तरीही या घटनेमुळे सायकलिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

आयोजकांचा निष्काळजीपणा नडला?

'बजाज पुणे ग्रँड सायकल टूर'मध्ये ५० हून अधिक सायकलस्वार एकमेकांवर आदळून झालेल्या भीषण अपघातानंतर आता आयोजकांच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या या स्पर्धेत सुरक्षेचे सर्व जागतिक नियम पाळले जात असल्याचा दावा आयोजकांनी केला होता. मात्र, प्रत्यक्ष स्पर्धेदरम्यान तिकोना किल्ल्याजवळील रस्ता अत्यंत अरुंद असल्याचे समोर आले आहे. वेगवान सायकलिंगसाठी अशा अरुंद मार्गाची निवड करणे हा आयोजकांचा चुकीचा निर्णय होता का? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. स्पर्धेत सहभागी झालेल्या अनेक खेळाडूंनी या दुर्घटनेनंतर आयोजकांविरुद्ध आपला रोष व्यक्त केला आहे.

जागतिक सायकलिंग फेडरेशनच्या देखरेखीखाली आयोजन

ही केवळ एक साधी सायकल शर्यत नसून, खेळाडूंच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेची कसोटी पाहणारी ४३७ किलोमीटर लांबीची एक मोठी मोहीम आहे. पुणे जिल्ह्यातील विविध भौगोलिक भागांतून जाणारा हा मार्ग आंतरराष्ट्रीय सायकलस्वारांसाठी मोठे आव्हान ठरणार आहे. या स्पर्धेमुळे पुण्याचे नाव आता पॅरिस आणि लंडनसारख्या जागतिक सायकलिंग शहरांच्या यादीत मानाने घेतले जात आहे. इतक्या मोठ्या स्तरावरील 'मल्टी स्टेज' शर्यत पार पाडण्यासाठी पुणे शहर आणि जिल्हा प्रशासनाने गेल्या काही महिन्यांपासून मोठी तयारी केली आहे. शर्यतीच्या मार्गावर विशेष बदल करण्यात आले असून, खालील बाबींवर भर देण्यात आला आहे: सायकलचा प्रचंड वेग लक्षात घेता मार्गावरील खड्डे आणि अडथळे दूर करण्यात आले आहेत. ४३७ किलोमीटरच्या या पट्ट्यात शर्यतीदरम्यान वाहतुकीचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. 'णउख' च्या नियमांनुसार वळणांवर आणि चढ-उतारांवर आवश्यक ते तांत्रिक बदल करण्यात आले आहेत. युनियन सायकलिस्ट इंटरनॅशनलने भारतात ही २.२ दर्जाची शर्यत आयोजित करण्यास मंजुरी देणे, हा भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी मोठा विजय मानला जात आहे. या स्पर्धेमुळे केवळ पुणेच नव्हे, तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पर्यटनालाही मोठी चालना मिळणार आहे.

टीईटी सक्तीतून...

यामध्ये २०११ पूर्वी आणि २०११ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांची स्वतंत्र माहिती मागवण्यात आली आहे. राष्ट्रीय बालहक्क शिक्षण कायदा लागू झाल्यानंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक असणार आहे. यामुळे २०११ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक ठरणार आहे. तथापि, २०११ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांना या सक्तीपासून सूट मिळण्याची शक्यता आहे. सरकारने या शिक्षकांसाठी वेगळा निर्णय घेण्याची तयारी सुरू केली असल्याचे सांगितले जात आहे. टीईटी परीक्षा सक्तीच्या निर्णयामुळे अनेक अनुभवी शिक्षकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. त्यांना अनेक वर्षांचा अनुभव असूनही, परीक्षा उत्तीर्ण करण्याचे बंधन त्यांच्यासमोर होते; परंतु, केंद्र सरकारच्या नवीन प्रस्तावामुळे या शिक्षकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. ज्या शिक्षकांनी आपल्या जीवनात शिक्षण क्षेत्रात अनमोल योगदान दिले आहे, त्यांना पुन्हा परीक्षा देण्याची सक्ती न लागण्याची आशा निर्माण झाली आहे.

गोविंद पानसरे....

आणि उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पानसरे हे प्रगतीशील विचारांचे समर्थक आणि सामाजिक वर्तुळात प्रभावशाली व्यक्ती होते. गायकवाडाला २०१५ मध्ये अटक करण्यात आली होती आणि तो चार वर्षांपूर्वी जामीनावर बाहेर आला होता. तेव्हापासून तो सांगलीतील विकास चौक परिसरातील आपल्या घरात राहात होता. या प्रकरणातील महत्त्वाचा दुवा मानला जाणारा गायकवाड मृत्यूनंतर तपास यंत्रणांसमोर या प्रकरणातील इतर आरोपी समोर आणण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. समीर गायकवाडच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. न्यायालयात हत्याकांडाचे खटले सुरु आहेत, परंतु गायकवाडच्या निधनामुळे प्रकरणाच्या पुढील तपासावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रशासन आणि पोलिस तपास यंत्रणा या घटनेची नोंद घेत, प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेण्याच्या दृष्टीने काम करत आहेत.

नागपुरात...

व्यापाराशी संबंधित दुकानांवरही आयकर पथकाने धडक दिली. या छाप्यांदरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. एके-४७ शस्त्रांनी सज्ज सुरक्षा कर्मचारी आणि डॉग स्क्वॉडच्या उपस्थितीमुळे परिसरात तणावपूर्ण शांतता होती. नागपूर हे मध्य भारतातील सुपारी व्यापाराचे प्रमुख केंद्र मानले जाते. येथून मोठ्या प्रमाणावर सुपारीचा पुरवठा विविध राज्यांमध्ये केला जातो, ज्यामध्ये तंबाखू, मावा आणि गुटख्याच्या निर्मितीसाठी वापरल्या जाणाऱ्या सुपारीचा समावेश असल्याचा संशय आहे. आयकर विभागाला या व्यापारातून मोठ्या प्रमाणावर करचुकवेगिरी आणि काळ्या पैशाचा व्यवहार झाल्याचा संशय आहे. मात्र, छाप्यांमध्ये नेमके काय निष्पन्न झाले याबाबत आयकर विभागाने अद्याप अधिकृत माहिती दिलेली नाही. तपास पूर्ण झाल्यानंतरच या कारवाईचे खरे स्वरूप समोर येईल, अशी माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. या कारवाईमुळे नागपूरच्या व्यापारी क्षेत्रात मोठी चर्चा सुरू असून, पुढील काही दिवसांत या प्रकरणाला नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अक्षय कुमारच्या...

रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच जुहू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सोशल मीडियावर या अपघाताचे व्हिडिओ वेगाने व्हायरल होत आहेत. मर्सिडीज चालक मद्यधुंद अवस्थेत होता का किंवा गाडीचा ब्रेक निकामी झाला होता का, याचा तपास सध्या पोलीस करत आहेत.

अपघातानंतर घटनास्थळी हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले. भरधाव मर्सिडीजने चिरडलेल्या रिक्षेत चालक बासित खान रक्ताच्या थारोळ्यात अडकला होता. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून आणि जीवाची पर्वा न करता मोठ्या कष्टाने अक्षय कुमारच्या डगत खाली अडकलेली रिक्षा बाहेर काढली. अपघाताचा प्रचंड आवाज आणि लोकांचा आक्रोश ऐकून स्वतः अभिनेता अक्षय कुमार आपल्या कारमधून खाली उतरला. त्याने परिस्थितीचा अंदाज घेण्याचा प्रयत्न केला, मात्र घटनास्थळावरील वाढती गर्दी, परिस्थितीची नाजूकता आणि सुरक्षेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याच्या सुरक्षा पथकाने त्याला तातडीने दुसऱ्या वाहनातून सुरक्षितस्थळी हलवले. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या बासित खानच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त केला आहे. बासितचा भाऊ समीर खान याने माध्यमांशी बोलताना पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तो म्हणाला, माझा भाऊ मृत्यूशी झुंज देत आहे, आमची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. आम्ही गरीब आहोत म्हणून आम्हाला पोलिसांकडून हवी तशी मदत मिळत नाहीये. आमची एकच मागणी आहे की, ज्या मर्सिडीज चालकाने हे कृत्य केले आहे, त्यानेच माझ्या भावाच्या उपचाराचा खर्च उचलावा आणि आमच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या रिक्षेच्या नुकसानीची भरपाई द्यावी.

घटनेची माहिती मिळताच जुहू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मर्सिडीज कार जप्त केली असून चालकाला ताब्यात घेतले आहे. मात्र, या प्रकरणी अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेले नाही. अक्षय कुमार यांच्या पीआर टीमकडूनही या घटनेवर सध्या मौन बाळगण्यात आले आहे. अपघात नेमका कसा झाला, याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

भारतावर पुन्हा...

महत्त्वाची बाब म्हणजे, भारताने 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानमध्ये दहशतवादी नेटवर्कवर कारवाई केल्यानंतर तेथून सातत्याने आक्रमक आणि द्वेषपूर्ण वक्तव्यांचा सूर वाढलेला दिसतो. त्याच पार्श्वभूमीवर हा व्हिडिओ समोर आल्याने खळबळ उडाली आहे.

दरम्यान, भारतीय सुरक्षा यंत्रणा अशा व्हिडिओंवर बारकाईने लक्ष ठेवून असून, केवळ सोशल मीडियावरील दाव्यांवर विश्वास न ठेवता त्यामागची सत्यता तपासली जात असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मात्र, अशा प्रकारचे संदेश आणि प्रशिक्षणाचे दावे ही बाब हलक्यात घेण्यासारखी नसल्याचंही तज्ज्ञांचं मत आहे.

महाराष्ट्राच्या तरुणाने....

तसेच न्यूझीलंडमध्ये हॉर्स रेसिंग स्पर्धेला मोठी प्रतिष्ठा आहे. हीच संधी साधून राहुल भारती या तरुणाने न्यूझीलंडमध्ये आपल्यातील कलागुण सिद्ध करून दाखवले आहेत. राहुल भारती यांचे वडील हे शेतकरी असून अत्यंत हालाखीच्या परिस्थितीमध्ये राहुल याने न्युझीलंडमध्ये जाऊन हॉर्स रेसिंग स्पर्धेत भारताचे नाव रोशन केले आहे. अलीकडेच न्यूझीलंडमध्ये हॉर्स रेसिंग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेमध्ये राहुल याने तब्बल २५ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले आहे. त्याच्या या यशाची माहिती मिळताच कान्हापुरी गावामध्ये आनंदाला उधाण आले आहे.

एकुर्गा येथील माजी...

माजी ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब रोडके, अमर इंगळे, तानाजी शिंदे, शत्रुघन गोरडे, संजय मोरे, प्रभावती इंगळे आणि बालकृष्ण अडसूळ यांच्यासह अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला. भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेल्या प्रत्येकांना सन्मानाची वागणूक दिली जाईल असे सांगून यावेळी आ. रमेशआप्पा कराड यांनी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत भाजपाच्या उमेदवारांना मताधिक्याने विजयी करण्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे

डॉ. स्वीकार कट्टी यांच्या सतार वादनाने देगलूरकर मंत्रमुग्ध

स्व.मदन देशपांडे १० वे स्मृती संगीत समारोह संपन्न





देगलूर(प्रतिनिधी): सुफी मित्रपरिवार देगलूर यांच्या तर्फे दरवर्षी स्वर्गीय मदन देशपांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ शास्त्रीय संगीत समारोहाचे आयोजन करण्यात येते यावर्षी या संगीत समारोहाचे दहाव्या वर्षात देगलूरकर यांना जगप्रसिद्ध सतारवादक डॉक्टर स्वीकार कट्टी यांच्या सतार वादनाचे सूर ऐकता आले तर त्यांच्यासोबत प्रसिद्ध तबलावादक रोहित देव यांची साथ लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांचे प्रतिनिधी बालाजी टेकाळे, ज्येष्ठ संगीत तज्ञ पंडित बाबुराव उपलवार गुरुजी, प्रसिद्ध बासरी वादक ऐनोद्दीन वारसी, ज्येष्ठ विचारवंत एच.एस. खंडागळे,संगीत साधना मंचचे अध्यक्ष लक्ष्मण अमृतवार,ज्येष्ठ पत्रकार अविनाश हसनाळकर , डॉ . सदावर्ते,शिवानंद स्वामी, येरगीचे आदर्श सरपंच संतोष पाटील ,छत्रपती संभाजी नगर येथील हाय कोर्टाचे ऍडव्होकेट अविनाश सूर्यवंशी,आदी उपस्थित होते.

काल १८ जानेवारी रोजी येथील भक्तापूर रोडवरील विश्व इंग्लिश पब्लिक स्कूलमध्ये आयोजित सदरील शास्त्रीय संगीत समारोहात अगदी गुलाबी थंडीत देगलूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला.

दीप प्रज्वलानंतर संगीत समारोहाचे प्रमुख कलाकार जगप्रसिद्ध सतार वादक डॉ. स्वीकार कट्टी, प्रसिद्ध तबलावादक रोहित देव , युवा बासरी वादक अनहद वारसी यांचे सुफी मित्र परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले.

स्वागत समारोह नंतर युवा बासरी वादक अनहद वारसी यांच्या बासरी वादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली . अनहद वारसी यांनी राग कौनशी कनाडा, विलंबित तीन ताल ,द्रुत तीन ताल प्रस्तुत करून उपस्थित रसिकांची मने जिंकली त्यानंतर प्रसिद्ध सतारवादक स्वीकार कट्टी यांनी सतारीवर राग पुरिया कल्याण रूपक आणि द्रुत तीन ताल प्रस्तुत करून सतारीच्या सुरामध्ये देगलूरकरांना चिंब भिजवून टाकले. कार्यक्रमाच्या शेवटी स्वीकार कट्टी आणि अनहदवारसी या दोघांनी राग रागेश्री मथालय आणि खमाज धून प्रस्तुत करत त्यांची जुगलबंदी मनमोहक रूपात सादर झाली. या या सतार आणि बासरीच्या जुगलबंदीस देगलूरकर यांनी भरभरून प्रतिसाद दिला. सायंकाळी ठीक साडेसहा वाजता कार्यक्रमास सुरुवात होऊन रात्री दहा वाजता कार्यक्रम संपन्न झाले. तब्बल साडेतीन तास देगलूरकर यांनी सतार आणि बासरी आणि सोबतीला प्रसिद्ध तबलावादक रोहित देव यांचा तबला याचे अनोखे संगीताचे शास्त्रीय मिश्रणाची जुगलबंदी श्रोत्यांनी अनुभवली.. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुफी मित्र परिवाराचे प्रसिद्ध बासरी वादक ऐनोद्दीन वारसी यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि प्रमुख कलाकारांचा परिचय बालाजी सुगावकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शन ऐनोद्दीन वारसी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुफी मित्रपरिवार आणि वेणुवृंद होट्टल च्या सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम केले. कार्यक्रमात महिला,पुरुष,युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.



शिक्षक सेनेचा जिल्हास्तरीय मेळावा

शिक्षकांसाठी प्रेरणादायी: आ. रोहीदास चव्हाण

नांदेड- महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या नांदेड जिल्हा शाखेने आयोजित केलेला जिल्हास्तरीय मेळावा जिल्ह्यातील तमाम शिक्षक शिक्षिकांसाठी प्रेरणादायी झाला असल्याचे प्रतिपादन शिवसेना (उबाठा)चे माजी आमदार तथा संपर्क प्रमुख रोहिदास चव्हाण यांनी केले. ते मेळाव्याचे उद्घाटक म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण, प्रमुख पाहुणे शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख बबन बारसे, शिवसेना महानगर प्रमुख प्रकाश मारावार, शिक्षक सेनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष बाळासाहेब राखे, परभणी जिल्हाध्यक्ष सायस चिलगर, युवा शहर प्रमुख नवज्योतसिंग गाडीवाले, उपजिल्हा प्रमुख पाशाभाई, रामराव मोरे, मधुकर मठपती, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर, परशुराम येसलवाड, तानाजी पवार आदींची उपस्थिती होती.

शहरातील हॉटेल विसावा पॅलेस येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना जिल्हा शाखा नांदेड चा जिल्हास्तरीय मेळावा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दीपप्रज्वलनाने मेळाव्यास प्रारंभ करण्यात आला. शिक्षकांचे सर्वच प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी शिवसेना (उबाठा) कटिबद्ध असल्याची ग्वाही मान्यवरांनी दिली. शिक्षक सेना पदाधिकारी शिक्षक सैनिक व यांच्या पाल्यांनी साहित्य, शैक्षणिक, कला क्रीडा, सांस्कृतिक, राष्ट्रीय कार्य, संघटनात्मक विशेष कामे केली यांचा सत्कार व सन्मान करुन प्रमाणपत्र व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी महिला जिल्हा उपाध्यक्षा पंचफुला वाघमारे व बालाजी बनसोडे सर यांना केंद्र प्रमुख जिल्हा प्रतिनिधी पदी नियुक्ती करुन नियुक्ती पत्र देण्यात आले.

मेळाव्याचे प्रास्ताविक शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष संतोष अंबुलगेकर यांनी केले. स्वागतगीत जिल्हा संघटक गोविंद सुवर्णकार यांनी आपल्या सुरेल आवाजात गायले. जिल्हाध्यक्ष तानाजी पवार, प्रा. परशुराम येसलवाड, बिलोली तालुकाध्यक्ष बालाजी गेंदेवाड, बाळासाहेब राखे, भुजंग पाटील, प्रकाश मारावार यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक काशीनाथ शिरसीकर व शिवकन्या पटवे यांनी केले तर आभार रवी बंडेवार यांनी केले. यावेळी शिक्षक सेनेत अनेक शिक्षकांनी प्रवेश केले. या वेळी शिक्षक सेनेचे राज्य उपाध्यक्ष विठुभाऊ चव्हाण यांनी शिक्षक सेनेच्या कामाचा आढावा घेऊन सविस्तर विवेचन केले. मेळाव्याच्या दुसऱ्या सत्रात संघटन मजबूत करणे, ध्येय धोरणे ठरविणे, शाखा विस्तार करणे, प्रलंबित प्रश्न बाबत दिशा ठरवणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली.

मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी गंगाधर कदम, गोपाल बंड्रेवार, गंगाधर करेवार, सचिन पाटील, अल्पसंख्याक चे शेख मुस्तफा, उपाध्यक्ष गंगाधर ढवळे, वसंत सिरसाट, राजेश पवार, प्रकाश कांबळे प्रकाश फुलवरे शिवकन्या पटवे शोभा गिरी मॅडम, केंद्र प्रमुख प्रतिनिधी बालाजी बनसोडे सर, बालाजी राजूरवार, अनिरुद्ध सिरसाळकर, संतोष किसवे, गोविंद सुवर्णकार, सचिन रामदिनवार, हमीद मोमीन, तालुका अध्यक्ष बालाजी गेंदेवाड, दिलीप पांचाळ, प्रकाश फुलवरे, नारायण लोखंडे, रामदास देशमुख सर, पानगंटवार सर, दत्ता पेंढारकर सर, पुंडलिक कारामुंगे, राजाराम कसलोड,संगेश पवार, बसपा कारखेडे, अनिल गवंडगावकर, बालाजी केंद्रे, सचिन कळसे, प्रा.सतीश धोंडगे, गायकवाड सर, रमन काब्दे,माधव उलिगडे,सरला शिवपुजे, सुनिता मिठ्ठेवाड , संतोष घटकार,ऊत्तम डोंमपल्ले,बंड्डापा स्वामी,संभाजी केंद्रे,मेकाले सर,कुमार कांबळे सर आदी शिक्षक सेनेच्या पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

सत्यभामा दिपके 'आदर्श परिचारिका' पुरस्काराने सन्मानित



देगलुर(प्रतिनिधी): समाजातील दुर्बल, वंचित व गरजू घटकांसाठी निःस्वार्थ भावनेने सातत्यपूर्ण सेवा करणारे सत्यभामा भीमराव दिपके (रा. सुंडगी) यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक, शैक्षणिक व मानवतावादी कार्याची दखल घेऊन 'आदर्श परिचारिका' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा सन्मान जेतवन सामाजिक शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्ट, सुजयतपूर यांच्या वतीने आयोजित तिसऱ्या अखिल भारतीय राष्ट्रीय महिला बौद्ध धम्म परिषद अंतर्गत प्रदान करण्यात आला. समाजातील वंचित, दुर्बल व गरजू घटकांच्या सेवेसाठी त्यांनी दाखविलेली सेवाभावी वृत्ती, प्रामाणिकपणा, संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांची निवड या पुरस्कारासाठी करण्यात आली.

सत्यभामा दिपके यांनी आपल्या कार्यातून समाजातील दुर्बल घटकांना न्याय, सन्मान व आत्मविश्वास देण्याचे कार्य केले आहे. वैयक्तिक लाभापेक्षा समाजहिताला अग्रक्रम देत त्यांनी आरोग्य सेवा, सामाजिक मदत, शैक्षणिक जागृती व नैतिक मूल्यांची जोपासना या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या सेवेमुळे अनेक गरजू कुटुंबांना आधार मिळाला असून समाजात सकारात्मक परिवर्तनाची प्रक्रिया वेगाने पुढे सरकत आहे. त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य म्हणजे सातत्य, चिकाटी व माणुसकीची जाणीव. कोणताही भेदभाव न करता त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील लोकांसाठी सेवा उपलब्ध करून दिली. त्यांच्या कार्यामुळे समाजात सेवाभावी वृत्तीचा आदर्श निर्माण झाला असून नव्या पिढीला समाजसेवेची प्रेरणा मिळत आहे. या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जेतवन सामाजिक शैक्षणिक चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने त्यांना गौरवपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष सावित्री ताई शेवाळकर, कार्यक्रमाचे अध्यक्षा, प्राध्यापिका छायाताई बोरकर, व पूजनीय भंतेजी यांच्या उपस्थितीत,हा सन्मान त्यांच्या कार्याची पावती असून भविष्यात अधिक जोमाने समाजोपयोगी कार्य घडत राहावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. पुरस्कार वितरणप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष, पदाधिकारी, मान्यवर पाहुणे, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व स्तरांतून सत्यभामा भीमराव दिपके यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील सामाजिक व सेवाभावी कार्यासाठी सदिच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

शिक्षण,आर्थिक स्वावलंबन आणि आत्मसन्मान हाच स्त्री सक्षमीकरणाचा पाया- डॉ.दीप्ती ढेरे



लातूर: येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सात दिवसीय शिबिराचे आयोजन मौजे दावतपूर,ता. औसा,जि.लातूर येथे दि.१७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे.या शिबिराच्या निमित्ताने ' महिला सक्षमीकरण ' या विषयावर दयानंद विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीप्ती ढेरे यांचे व्याख्यान ग्रामीण महिलांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी दि.१८ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेले होते.

व्याख्यान प्रसंगी बोलताना डॉ.दीप्ती ढेरे म्हणाल्या,महिलांना शिक्षण अर्थ,आरोग्य आणि राजकीय क्षेत्रात समसमान संधी निर्माण करून देणे म्हणजे सक्षमीकरण किंबहुना, महिलांनी स्वतःला संधीच्या योग्य बनवणे आणि स्वतःमध्ये योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे म्हणजे खरे सक्षमीकरण.महिलांसाठी शिक्षण हे खूप महत्त्वाचे आहे. शिक्षणामुळे स्त्री आत्मविश्वासाने जगू शकते,आलेल्या समस्यांना तोंड देऊ शकते,आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करू शकते,पण आजच्या काळात स्त्रियांना किंबहुना विद्यार्थिनींना शिक्षणासोबतच समाजशिक्षण घेणे जरुरी आहे.आज बहुतांश मुली उच्च शिक्षणासाठी घरापासून,कुटुंबापासून लांब राहतात,मग अशावेळी आत्मसंरक्षण करता येणे आणि आत्मभान जपणे खूप महत्त्वाचे आहे.आज बहुतांश महिलांकडे आणि मुलींकडे मोबाईल फोन आहे,त्याचा योग्य वापर करावा, सोशल मीडियाच्या अभासी जगतात चुकीच्या मैत्रीपासून, प्रलोभनांपासून स्वतःला सुरक्षित ठेवावे आणि सावध राहावे.आज महिलांनी आत्मप्रतिष्ठा जपणे खूप महत्त्वाचे आहे.मोबाईल तुमचा मित्र होऊ शकतो,पण त्याला तुमचा हितशत्रू होऊ देऊ नका.खूप शिका आणि आत्मविश्वासाने जगा.

आर्थिक स्वातंत्र्याच्या बाबतीत बोलताना डॉ.ढेरे असेही म्हणाल्या की,स्त्रिया शिकल्या की स्वतः कमावू लागतात. नोकरी,व्यवसाय, उद्योग, शेती अशा विविध क्षेत्रात स्वतःला सिद्ध करतात.पण फक्त पैसा कमावणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य नव्हे तर त्या पैशाचे योग्य आर्थिक नियोजन तिला करता येणे आणि करायचे स्वातंत्र्य मिळणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य.आर्थिक सबलीकरण स्वतःचे स्वतंत्र बँक खाते असणे त्याच्याशी निगडित व्यवहार करता येणे, पैसे गुंतवणुकीचे विविध पर्याय निवडणे आणि असे करून आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे महत्त्वाचे आहे.तसेच स्त्रियांसाठी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचे आरोग्य.बहुत करून स्त्रियांमध्ये रक्ताची कमतरता,जीवनसत्वांचा अभाव, हाडांचे दुखणे हे आजार पाहायला मिळतात.कारण, स्त्री सर्व कुटुंबाची काळजी घेते,पण स्वतःच्या आरोग्याला नेहमीच दुय्यम स्थानी ठेवते. याचीच परिणीती मग आरोग्यविषयक समस्यांमध्ये होते, त्यामुळे सर्वप्रथम स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे, स्वतःच स्वतःच्या आरोग्याची जबाबदारी घेणे म्हणजे सबलीकरण. राजकीय क्षेत्रात महिलांना मिळणारी संधी हा सुद्धा महिला सक्षमीकरणाचाच एक भाग आहे.आज महिला सरपंच पदापासून ते राष्ट्रपती पदापर्यंत सर्व प्रकारच्या राजकीय पदांवर स्वतःला सिद्ध करत आहेत,पण यात महिलांचा सहभाग आणखी वाढविणे महत्त्वाचे आहे.थोडक्यात,सक्षम महिला सक्षमीकरण म्हणजे मी सुद्धा हे करू शकते हा आत्मविश्वास स्त्रियांमध्ये निर्माण होणे आणि तो होण्यासाठी महिलांनी सक्षमपणे व्यक्त व्हायला शिकले पाहिजे असे मत डॉ.ढेरे यांनी व्यक्त केले. व्याख्यानप्रसंगी दावतपूर येथील ग्रामस्थ महिला, विद्यार्थीनी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सहभागी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे,डॉ.अमोल ठोसर, डॉ. शिलेश गावित,प्रा.मेघा आत्राम इत्यादी उपस्थित होते.

लिंगायत महासंघातर्फे लातुरात नूतन नगरसेवकांचा सत्कार

लातूर- महापालिकेत काँग्रेस पक्षाकडून ४ आणि भाजपकडून ४ असे एकूण ८ नगरसेवक लिंगायत समाजाचे निवडून आले आहेत. लिंगायत महासंघाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष प्रा. सुदर्शन बिरादार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नवनिर्वाचित नगरसेवक स्नेहल उटगे, श्रावणी झिपरे, गिरीश ब्याळे, गणेश गवारे, संगीता मिरचे यांच्यासह शोभाताई पाटील, अनंत गायकवाड यांचाही सत्कार करण्यात आला. प्रेरणा होनराव, दीपक मठपती यांचाही लिंगायत महासंघाच्यावतीने सत्कार करण्यात येणार आहे.

दयानंद विज्ञानच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्याच्या माध्यमातून दिले पर्यावरण संवर्धनाचे धडे



लातूर : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयातील विज्ञान मंडळाच्या वतीने मोजे दावतपुर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संरक्षणासंदर्भात जनजागृती व्हावी म्हणून दि.१८ जानेवारी २०२६ रोजी पथनाट्य सादर करण्यात आले.हे पथनाट्य सादर करण्यासाठी विज्ञान मंडळाचे समन्वयक प्रा.शिलेश गावित,डॉ. दीप्ती ढेरे, डॉ.श्वेता लोखंडे,प्रा. ऐश्वर्या अंधारे,प्रा.पूजा नंदगावे यांनी मार्गदर्शन केले.या पथनाट्य सादरीकरणात प्रज्वल लामतूरे, ओंमकार चव्हाण,ओंमकार कापसे,वेदांती वाघे,वर्चस्वी पटणी,आकांक्षा मणियार, निकिता जाधव,राजनंदिनी देशमुख,राधा जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सदरील पथनाट्य सादर करताना बेकायदेशीर वृक्षतोड थांबवा,पाणी आडवा,पाणी जिरवा,झाडे लावा,झाडे जगवा,सेंद्रिय शेती करू,विषमुक्त खाऊ,प्लास्टिक टाळू,कागद वापरू,निसर्गाचा करू नका ऱ्हास,नाही तर होईल श्वासाचा त्रास,पर्यावरण रक्षण हेच आपले कर्तव्य अशा विविधांगी स्वरूपाचे धडे ग्रामस्थांना दिले.याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर,डॉ.सुरज कोल्हे,प्रा.मेघा आत्राम,विज्ञान मंडळ अध्यक्ष यश झंवर,विना भंडारी,प्रिया गोराड व रासेयो स्वयंसेवक,इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक- कुंडलिकराव अतकरे

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी- जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी निरंतर वाचन आवश्यक असुन शासकीय विभागीय ग्रंथालयातील ग्रंथांचे दालन सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मराठी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष कुंडलिकराव अतकरे यांनी केले.

मराठी भाषा संवर्धन पंधरवडयानिमित्त शहरातील समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे कार्यक्रमप्रसंगी उदघाटक म्हणून अतकरे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा ग्रंथालय संघाचे कार्यवाह श्री गुलाबराव मगर जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री सुभाष साबळे, देवगिरी कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वनिता निकम,जीवन कुलकर्णी व देवगिरी हायस्कूलचे शिक्षक श्री कोलते हे उपस्थित होते.



मातृभाषेचा संस्कार व्यक्तीच्या अंतःकरणात खोलवर रुजलेला असतो. आनंद व दुःखासारख्या तीव्र भावना अनुभवताना मुखातून बाहेर पडलेले उद्गार हे मातृभाषेतीलच असतात.मराठी शब्दसाठा वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील ग्रंथांचे वाचन करण्याचे आवाहन सुनील हुसे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले. तर सुत्र संचालन व आभार प्रदर्शन तांत्रिक सहाय्यक गोविंद खेडकर यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षकवृंद व विद्यार्थी, विभागीय ग्रंथालयाचे सभासद,वाचक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाअखेर उपस्थित विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथ वाचन केले. सदर ग्रंथप्रदर्शन दि.२८ तारखे पर्यंत सर्वांसाठी खुले असुन नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनाला भेट द्यावी व शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद होऊन येथील वाचन सुविधेचा लाभ घेण्याविषयी आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्री संतोष जाधव यांनी केले आहे.

दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या रा.से.यो. अंतर्गत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर



लातूर: येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय लातूर अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक युवक शिबिराच्या निमित्ताने मौजे चिंचोलीराव ता. जि. लातूर येथे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कार्यालय व महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या संयुक्त विद्यमाने व डॉ. साकेब उस्मानी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या निर्देशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. याप्रसंगी महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अग्निशमन अधिकारी श्री. गणेश चौधरी, यंत्रचालक श्री. विकास इंगोले, फायरमॅन श्री. शरद माने, फायरमॅन श्री. अमोल वाघमोडे यांच्या चमूने आपत्तीच्या वेळी घ्यावयाची दक्षता, बचाव कार्य व अग्निशमन तंत्र याबाबत सविस्तर माहिती देत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, प्रा. विशाल चव्हाण, प्रा. योगेश शर्मा यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रसंगी उपस्थितांनी प्रात्यक्षिकाचा लाभ घेत आपत्ती व्यवस्थापनाविषयी महत्त्वपूर्ण माहिती आत्मसात केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. योगेश शर्मा व आभार प्रदर्शन डॉ. विशाल वर्मा यांनी केले. सदरील प्रात्यक्षिके यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल उपस्थित मान्यवरांचे व आपत्ती व्यवस्थापन पथकाचे आभार मानण्यात आले.

आगीत दीड एकर ऊस जळून खाक

निलंगा, - विद्युत रोहित्रात लागलेल्या आगीत तालुक्यातील सावनगीरा येथील एका शेतकऱ्याचा दीड एकर उसासह संपूर्ण ठिबक सिंचन जळून खाक झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली.

सावनगीरा येथील शेतकरी बालाजी शेषराव सोळंके यांच्या गट नंबर १३८ मधील शेतात असलेल्या विद्युत रोहित्रात अचानक आवाज झाला. क्षणातच ठिणगीने आगीचे भीषण रूप धारण केले. पाहता पाहता दीड एकर ऊस जळून खाक झाला. घटनेची माहिती माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांनी निलंगा पालिकेच्या अग्निशमन यंत्रणेला दिली. तत्काळ अग्निशमन दलाने घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. पण दीड एकर ऊस, पाईप व ठिंबक सिंचन जळून खाक झाले.

अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड. गोरक्ष लोखंडे यांचा दौरा

लातूर, : राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ड. गोरक्ष लोखंडे हे २१ ते २३ जानेवारी २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीसाठी लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. या दौऱ्यादरम्यान जिल्ह्यातील विविध नगरपरिषदांमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. धाराशिव येथून २१ जानेवारी रोजी रात्री त्यांचे लातूर शासकीय विश्रामगृह येथे आगमन होईल व मुक्काम करतील.

राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ड. लोखंडे यांच्या उपस्थितीत सकाळी ११ वाजता उदगीर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची बैठक होईल. यावेळी ते राबविण्यात येणाऱ्या योजनांचा, तसेच आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी करणार आहे. तसेच अनुसूचित जाती जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी, लाड पागे, दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना, घरकुल योजना,अनुदानाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे. यानंतर दुपारी १२ वाजता लातूरचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त यांच्या समवेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा व खर्चाचा आढावा घेऊन चर्चा करतील.

दुपारी १ वाजता अहमदपूर नगरपरिषद मुख्याधिकारी, दुपारी २ वाजता चाकूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, दुपारी ३.३० वाजता जळकोट नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, सायंकाळी ५ वाजता औसा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्यासोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच २३ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता निलंगा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, दुपारी १२.३० वाजता रेणापूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, दुपारी २ वाजता शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीचे मुख्याधिकारी, सायंकाळी ५ वाजता देवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांची आढावा बैठक घेणार आहेत. यावेळी विविध योजनांचा, तसेच आर्थिक दुर्बल घटकांवर केलेल्या खर्चाचा मागील पाच वर्षांचा आढावा व कामाची तपासणी करणार आहे. तसेच अनुसूचित जाती जमातींना प्राप्त होणाऱ्या निधीबाबत आढावा व कामाची तपासणी, लाड पागे, दलित वस्ती, अण्णाभाऊ साठे सुधार योजना, घरकुल योजना,अनुदानाबाबत तसेच सफाई कर्मचारी टेंडर व सफाई कर्मचाऱ्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे. २४ जानेवारी रोजी ते लातूर येथून पुणेकडे रवाना होतील.

महात्मा बसवेश्वर मध्ये महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेचे २१, २२, २३ जानेवारी यादरम्यान आयोजन

लातूर- येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात प्रतिवर्षाप्रमाणे दिनांक २१ जानेवारी ते २३ जानेवारी २०२६ या कालावधीत महात्मा बसवेश्वर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी अभ्यासिकेत दररोज दुपारी ४:०० वाजता ही व्याख्यानमाला संपन्न होणार असून याचे उद्घाटन समारंभ बुधवार दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या अध्यक्षतेखाली व शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते तथा संवाद तज्ज्ञ प्रा.डॉ विश्वाधार देशमुख हे भूतां परस्परे जडो, मैत्र जीवांचे या विषयावर पहिले पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसे चिंचोलीकर, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर हे उपस्थित राहणार आहेत.

२२ जानेवारी २०२६ रोजी दुसरे पुष्प शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांचे अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार ज्ञानेश्वर बंडगर हे महात्मा बसवेश्वर आणि महाराष्ट्रातील संत परंपरा या विषयावर दुसरे पुष्प गुंफणार आहेत. या कार्यक्रमाला संस्थेचे कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे ,संचालक काशिनाथ साखरे, संचालक बाबुराव तरगुडे हे उपस्थित राहणार आहेत.

दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प शिक्षण संस्थेचे संचालक राजेश्वर बुके यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या अँड. रंजना पगार- गवांदे या समाज वास्तवाला भिडताना या विषयावर तिसरे विचारपुष्प गुंफणार आहेत. कार्यक्रमाला सहसचिव सुनीलआप्पा मिटकरी ,संचालक गुरूलिंग धाराशिवे, संचालक बस्वराज येरटे, संचालिका सौ.ललिताबाई पांढरे, संचालक राजेश्वर पाटील संचालक महेश हालगे हे उपस्थित राहणार आहेत. महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेत विगत ४५ वर्षापासून समाजप्रबोधनाचे व्रत घेऊन महात्मा बसवेश्वर व्याख्यानमाला अखंडपणे चालू आहे. या व्याख्यानमालेच्या तीन दिवस चालणाऱ्या या व्याख्यानमालेत सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे ,मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.नितीन वाणी ,संयोजन समितीचे प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे सहसंयोजक प्रो.डॉ सिद्राम डोंगरगे,डॉ.मनोहर चपळे ,डॉ प्रमोद सराफे,प्रा. संगमेश्वर पानगावे,प्रा. व्यंकट दुडिले, प्रा डॉ.टी. घनश्याम ,प्रा.कल्पना गिराम ,डॉ.अश्विनी रोडे,प्रा. जयश्री पाटील,प्रा. अनिता घवले, प्रा किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, महादेव कोरे, सय्यद जलील, श्रीकृष्ण बडगिरे व शुभम बिराजदार यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर, : कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २० जानेवारी, २०२६ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ०३ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

निवडणूक कालावधीत जात, धर्म व भाषावार शिबिरे

मेळावे बंद; जिल्ह्यात ७ फेब्रुवारीपर्यंत निर्बंध

धाराशिव, - राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्याने, त्या दिवसापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी, या उद्देशाने धाराशिव जिल्ह्यात महत्त्वाचा आदेश जारी करण्यात आला आहे.

निवडणूक कालावधीत जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे जात, धर्म किंवा भाषावार शिबिरे व मेळावे आयोजित केल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ चा वापर करून जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत, कुठेही कोणत्याही प्रकारचे जात, भाषा किंवा धार्मिक शिबिरे व मेळावे आयोजित करण्यावर निर्बंध घातले आहेत.

कृषि महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा संपन्न



लातूर. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत लातूर येथे कार्यरत कृषि महाविद्यालय, विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, कृषि तंत्र विद्यालय, गळीतधान्ये संशोधन केंद्र आणि विभागीय कृषि विस्तार शिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमीत्त त्यांचा इतिहास व कार्य यावर आधारित वक्तृत्व स्पर्धा कृषि महाविद्यालयात संपन्न झाली.

स्पर्धेत पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी गुरु तेग बहादूर यांनी सर्वधर्मियांच्या अस्मिता जपण्यासाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना सत्याच्या रक्षणासाठी निर्भयपणे उभे राहण्याचे, त्यासाठी कितीही त्रास झाला तरी सत्याची बाजू न सोडण्याचा श्री तेग बहादूर साहिबजी यांचा गुण अंगीकारावा असे आवाहन केले. स्पर्धेचे परीक्षक महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ.घनश्याम ताडेवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या चरित्रातील छोटया- छोटया प्रसंगातून त्यांनी समाजाला दिलेली शिकवण समजून घेण्यास सांगीतले. वक्तृत्व स्पर्धेत सादरीकरण करताना विद्यार्थ्यांनी विषयाचे सखोल ज्ञान, भाषाशैली, हावभाव व वेळेचे नियोजन यावर भर द्यावा याकडे त्यांनी लक्ष वेधले. या स्पर्धेत अनिकेत नागलवडे, जानवी तुमसरे व गंगाप्रसाद गोगराड या विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. कार्यक्रमास डॉ.व्यंकट जगताप, डॉ.विजय भामरे, डॉ.महेंद्र दुधारे हे प्रमुख अतिथी उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.(डॉ.) इंद्र मणि यांच्या प्रेरणेने व संचालक शिक्षण डॉ.भगवान आसेवार यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ.अनिलकुमार कांबळे, जिमखाना सचिव डॉ.दयानंद मोरे, डॉ.ज्ञानेश्वर सुरडकर व विद्यार्थी प्रतिनिधी रोहीणी भुजडे, मोहन होगे, महेश पवार व अभिषेक यांनी विशेष परिश्रम घेतले.

लोकशाही अधिक समृध्द करण्यासाठी ग्रंथालये महत्वाची : माधवराव पाटील टाकळीकर



लातूर,दि.१८: आपली लोकशाही अधिक सुसंस्कृत,समृध्द करण्यासाठी ग्रंथ,सार्वजनिक ग्रंथालये आणि त्यात काम करणारे प्रशिक्षित ग्रंथालयीन कर्मचारी महत्वाचे आहेत,असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव ऍड.माधवराव पाटील टाकळीकर यांनी येथे केले.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग,ग्रंथालय संचालनालयाच्या,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाच्यावतीने चालविण्यात येणाऱ्या ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्गाच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून ऍड.टाकळीकर बोलत होते.अध्यक्षपदी जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ग्रंथमित्र प्रभाकर कापसे हे होते.मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शासकीय ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद शेवाळे,माजी जि.प.सदस्य महेश पाटील,प्राचार्य डॉ.अमित म्हेत्रे तर संघाचे कार्यवाह ग्रंथमित्र राम मेकले,उपाध्यक्ष ग्रंथमित्र युवराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. संविधान निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्ञानाचे महत्व हे भारतीय संविधान देशाला देवून दाखविले आहे.ज्ञान अर्थात ग्रंथ,ग्रंथालये हे देशाची लोकशाही समृध्द करण्याचा मुळ पाया आहे किंबहुना ती देशाला संस्कार,दिशा देणारे मुळ आहे असे सांगून,माधवराव पाटील टाकळीकर यांनी म्हणाले की,आज एआयची चर्चा होतेय पण त्याला माहिती ग्रंथातूनच मिळते.कोणताही शोध ज्ञान,ग्रंथ वाचनातून पुढे येतो,म्हणून ती वृध्दींगत होण्यासाठी शासनासोबतच,सार्वजनिक उपक्रमांनी सीएसआरमधून सार्वजनिक ग्रंथालयांना हात द्यावा असे आवाहन केले.

बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करत वाचकांना अधिकाधिक,अद्यावत माहिती पुरविण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी करावे,ही कला आहे,ती आत्मसात करुन एलटीसी कोर्समुळे नोकरीच्या संधीविषयी जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी अवगत केले. प्राचार्य डॉ. शेवाळे यांनी,ग्रंथपाल हा वाचक आणि ग्रंथांना जोडणारा सेतू आहे, माणसाच्या जीवनातील ज्ञानप्रवासात ग्रंथपालाची भूमिका महत्वाची असून,वाचनसंस्कृती पुढील आव्हाने रोखण्यासाठी सेवाभावाने काम करावे असे आवाहन केले. अध्यक्षीय समारोपात ग्रंथमित्र प्रभाकर कापसे यांनी ग्रंथपालन वर्गाच्या अभ्यासक्रम व त्यामुळे निर्माण झालेल्या संधीची माहिती देवून वर्गाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले. प्रास्ताविकात ग्रंथमित्र राम मेकले यांनी ग्रंथपालन वर्गाची माहिती व आरंभापासून,यावर्षी संघाला अधिक एक वर्ग तुकडी मिळाल्या असून,लागलीच वर्गाला सुरुवात होणार असल्याचे सांगून,मान्यवरांचे स्वागत केले.

यावेळी डॉ.अमित म्हेत्रे यांनी ग्रंथपालन वर्गाच्या अभ्यासक्रम व उपयोगीता विषयी मार्गदर्शन केले. प्रारंभी डॉ.एस.आर. रंगनाथन् यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करुन अभिवादन आणि प्रमुख मान्यवर व वर्गशिक्षकांचा शाल,ज्ञानेश्वरी ग्रंथ देवून सन्मान करण्यात आला.तसेच ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष,माजी आ.गंगाधर पटणे यांनी श्रध्दांजली वाहण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे संचालक अजित पाटील यांनी केले.

आभार संचालक बाळकृष्ण होळीकर यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता झाली. कार्यक्रमाला जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, ग्रंथमित्र धनंजय पवार, ग्रंथमित्र सूर्यकांत जाधव, ग्रंथमित्र काशिनाथ बोडके,ग्रंथालय संघाचे संचालक ग्रंथमित्र सूर्यकांत शिरसे, संचालक अशोक खोडवे, नंदकुमार घोगरे, तुकाराम सुगावकर, नागनाथ बिरादार, शिक्षक महेश राजमाने, डॉ.युवराज अंधोरीकर, प्रा.शारदा कनामे, गिरीधर जंगाले, बी.एम.कुलकर्णी, लक्ष्मण फुलारी,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आरोग्यदायी कार्यसंस्कृतीकडे पाऊल 'दयानंद वाणिज्य' मध्ये मोफत बॅडमिंटन उपक्रमाचा प्रारंभ



लातूर : लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला असून महाविद्यालयात मोफत बॅडमिंटन प्रशिक्षण व सराव सुविधा सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

या वेळी बोलताना प्राचार्य डॉ. मान्नीकर यांनी सांगितले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सतत शैक्षणिक, प्रशासकीय व दैनंदिन कामांच्या तणावात कार्यरत असतात. अशा परिस्थितीत नियमित खेळ व व्यायाम अत्यंत आवश्यक असून बॅडमिंटनसारखा खेळ आरोग्य राखण्यासाठी उपयुक्त आहे. या उपक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी महाविद्यालयाच्या क्रीडागृहात आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित सहभागासाठी प्रोत्साहित केले आहे. बॅडमिंटन खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक प्रसन्नता लाभते, तसेच परस्पर स्नेह व सहकार्याची भावना वाढीस लागते, असेही त्यांनी नमूद केले. उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, क्रीडा संचालक डॉ. अशोक वाघमारे यांच्यासह विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मोफत बॅडमिंटन उपक्रमाला कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा हा उपक्रम इतर शैक्षणिक संस्थांसाठी आदर्श ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.